
शब्दांश

# फुलले रे

## कथासंग्रह e-book



# प्रस्तावना

*'काही आठवणी असतातच अश्या गुंतागुंतीच्या, सोडवायचं म्हंटल तर एक नवीन आठवण निर्माण करतात. काही नाती न उलगडणारी असतात तर काही बंध न सुटणारे.*

*कोणत्या नात्याला किती महत्व द्यायचं ये प्रत्येकजणावर अवलंबून असत. पण काही नात्यांमध्ये असा जिव्हाळा आपसूकच येतो. बऱ्याचदा एखाद्या व्यक्तीशी आपलं नातं काय हे महत्वाचं नसत, तर महत्व असत भावनांना, त्याच्यावर असणाऱ्या विश्वासाला.*

*अश्याच विश्वासाच्या, जिव्हाळ्याच्या, आणि आपुलकीच्या कथा घेऊन येत आहे, हे आमचे ई पुस्तक....*

## फुलले रे !



# फुलले रे ! [ई-कथासंग्रह]

----------------------------



**शब्दांश प्रकाशन**

*sevasahitya@gmail.com*
*https://www.facebook.com/sevasahitya*

**मुखपृष्ठ** - स्वप्ना बालापुरे
**आवृत्ती** - प्रथम
**संपादक मंडळ** - अर्चना चौधरी/गवस, सिद्धी चव्हाण, पल्लवी कुलकर्णी/सुकळीकर, वैशाली चाटे.
**मांडणी** - सिद्धी चव्हाण
**पृष्ठ संख्या** - ५६

'फुलले रे!' या कथासंग्रहातील सर्व घटना, पात्र, ठिकाण तसेच प्रसंग हे पूर्णतः काल्पनिक असून त्याचा वास्तवातील कोणत्याही व्यक्ती, घटना किंवा ठिकाण याच्याशी कोणत्याही प्रकारचा कसलाही संबंध नाही. असे काही आढळून आल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.

या ई पुस्तकात प्रकाशित केलेल्या कथा आणि त्यावर मांडलेली मते याची संपूर्ण जबाबदारी कथा लेखिकांची असेल. पुस्तक वाचनासाठी निशुल्क उपलब्ध असले परंतु विनामूल्य नाही. मूल्य स्वरूपात आपण आम्हाला आपल्या अमूल्य प्रतिक्रिया नक्कीच देऊ शकता. आपल्या बहुमोल अश्या सूचना सुद्धा नक्कीच द्या. आपले वाचून झाल्यावर आपण हे पुढे पाठवू शकता. तरीही हे ई पुस्तक कोणत्याही वेबसाईटवर ठेवण्याआधी किंवा वाचना व्यतिरिक्त वापर करण्यापूर्वी लेखिकांची लेखी परवानगी आवश्यक आहे.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकांकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनमुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रूपांतरण करण्यासाठी लेखिकांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

शब्दांश प्रकाशनच्या आतापर्यंतच्या
वाटचालीमध्ये हातभार लाभलेल्या
हितचिंतकांना,
तसेच आमच्या वाचनप्रेमी मित्र परिवाराला
आणि कुटुंबीयांना समर्पित.



# मनोगत



# सिद्धी चव्हाण

*'उद्यमेन हि सिद्ध्यन्ति कार्याणि न मनोरथैः!'*

‘या संस्कृत श्लोकाप्रमाणे कोणतेही काम पूर्ण करण्यासाठी उत्साह गरजेचा आहे, फक्त कल्पना आणि मनसुबे रंगवून काहीही साध्य होत नाही. कृती महत्वाची. उत्साहाने प्रफुल्लीत असलेला माणूस काहीही साध्य करू शकतो म्हणतात. आमचे **'शब्दांश प्रकाशन'** हे याचेच एक उदाहरण. चारचौघींचा गट ते अंक आणि आता वाटचाल सुरु आहे, ई-बुक च्या दिशेने. पहिल्या आवृत्तीची मुहूर्तमेढ रोवताना अनेक शंका-कुशंका मनात होत्या, पण एकमेकींच्या साथीने त्यावर मात करून आम्ही आपल्यासाठी काही निवडक कथा इथे घेऊन आलो आहोत. फुलतं जाणाऱ्या आमच्या प्रकाशनाप्रमाणेच आम्ही आपल्यासाठी घेऊन येत आहोत, अंतरंग प्रेमाने फुलवून देणाऱ्या कथांचा संग्रह '**फुलले रे !**'.

आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात प्रेम, माया, जिव्हाळा आणि नातीगोती यांना आपण खूप महत्व देत असतो. कारण या सगळ्यामधूनच आपले आयुष्य फुलतं जाते, अश्याच फुलणाऱ्या माझ्या '**गोष्ट हजाराच्या नोटेची**' आणि '**घुमणं**' या दोन कथा इथे तुमचे मन प्रफुल्लित करायला येणार आहेत.

तर प्रेमाची आणि अर्थातच नात्यांची परिभाषा फुलवणारे, खुलवणारे आणि बदलणारे असे हे पुस्तक नक्की वाचा आणि आपल्या अमूल्य प्रितिक्रिया आमच्यापर्यंत निसंकोचपणे पोहोचवत राहा.’

**वैयक्तिक संकेतस्थळ** - https://siddhic.blogspot.com

**मेल संपर्क** - siddhic1991@gmail.com

अर्चना गवस चौधरी

## सबकुछ लिखा हुआ है!

आपण काही अर्थ लावायच्या आधीच त्या गोष्टी घडतात. त्यात आंतरजालावर तर जलद गतीने घडतात. सिद्धी,पल्लवी आणि वैशाली दिवाळी अंकानिमित एकमेकांना भेटलो, गेले 3 वर्ष आम्ही अंक प्रसिद्ध करतो आहोत. ह्या वेळी विचार आला एक e book काढुया. विषय ठरला "प्रेम", प्रेम ह्या विषयावर आम्ही कथा लिहिल्या त्या ह्या कथा संग्रहात असणार आहेत. त्यात माझ्या 2 कथा आहेत

"एका लग्नाची काय माहिती कितवी कथा" आणि "परात्पराय नमः" एका लग्नासाठी काय, किती, कुठे, कशाला गोष्टी घडतात ते लिहायचा प्रयत्न केला आहे तर दुसऱ्या गोष्टी मध्ये मुलगा, आई आणि आईचे वडील म्हणजे आजोबा ह्यांच्या समान दुव्यावर असलेलं प्रेम मांडायचा प्रयत्न केला आहे.

चुका झाल्या तर हक्काने सांगा, काय चांगलं वाटलं ते ऐकायला, वाचायला कान, डोळे उत्सुक आहेतच. नक्की नक्की सांगा काय वाटत आहे ते.

वैयक्तिक संकेतस्थळ - https://www.facebook.com/rangmantale
मेल संपर्क - 9158982904 / archanachaudhari20079@gmail.com



# वैशाली चाटे

‘मनातील प्रत्येक भावना व्यक्त करता येत नाही, त्या भावना शब्दरूपात व्यक्त करण्यात 'शब्दांश' ची मदत झाली. मनातील विचार शब्दात मांडण्यासाठी प्रोत्साहन देणाऱ्या माझ्या मैत्रिणी अर्चना,सिध्दी आणि पल्लवी यांच्या ऋणात मला कायम राहायला आवडेल. गेले 3 वर्ष आम्ही दिवाळी अंक प्रसिद्ध करत आहोत.ह्यावेळी एक e-book काढुया असा विचार आला.

विषय ठरला "प्रेम". प्रेम हा प्रत्येकाचाच जिव्हाळ्याचा विषय आहे. मग ते प्रेम आईचं, वडिलांचं, नवऱ्याचं, मित्राचं, प्रियकराचं वा निसर्गाचं असो. प्रत्येक नात्याचा गोडवा वेगळाच.....पण मुळाशी असलेली भावना मात्र एकच "प्रेमाची"!
या पार्श्वभूमीवर '**फुलले रे !**' या कथासंग्रहात आम्ही काही कथा लिहिल्या आहेत,त्यापैकी माझ्या दोन कथा आहेत '**मन उधाण वाऱ्याचे**' आणि '**जुळून येती रेशीमगाठी**'.

मनामध्ये साचलेल्या भावना या कथांमध्ये मांडण्याचा छोटासा प्रयत्न केला आहे. चुका पदोपदी असणारच त्या बिनधास्तपणे सांगा.तुमच्या प्रतीक्रियांतुनच पुढील लिखाणाला प्रोत्साहन मिळेल.’

मेल संपर्क - vaishalichate51@gmail.com

# पल्लवी कुलकर्णी/ सुकळीकर

4 मुली एकत्र आल्या की काय करतील असे वाटते?

गप्पा, गॉसिप, संसारातील सुखदुःखाचं sharing? की नुसता timepass? हे सगळं करणं ज्याची त्याची निवड असली तरी समविचारी, मेहनती मुली एकत्र team म्हणून आल्या की काय घडू शकते ह्याचं स्वानुभवावरून उत्तम उदाहरण देऊ शकते.

स्वस्तुतीचा डंका म्हणून नाही तर केवळ आम्ही करत असलेली प्रामाणिक मेहनत तुमच्यापर्यंत पोचवण्यासाठी हे शब्द लिहित आहे.

आज शब्दांश प्रकाशनाच्या माध्यमातून आम्ही 3 दिवाळी अंक (स्पंदन ) आणि 2 स्त्री विशेषांक online स्वरूपात प्रसिद्ध केले आहेत.

आज '**फुलले रे !**' हा कथासंग्रह तुमच्या हाती देताना अत्यंत आनंद होत आहे. आमचं हे पहिलं ई पुस्तक आहे, मोफत वाचनासाठी उपलब्ध असणार आहे. ह्यातील सर्व कथा ह्या आम्हीच लिहिलेल्या आहेत. माझ्या दोन कथा आहेत, 'कुसुम' आणि ' डेटिंग बिटिंग'.

आशा आहे की त्या तुम्हाला आवडतील व ह्या कथासंग्रहाचे तुम्ही प्रेमाने स्वागत कराल, भरभरून प्रतिसाद द्याल.

वैयक्तिक संकेतस्थळ - https://killicorner.in

मेल संपर्क - kulkarnipallavi4@gmail.com

# कथा

# अनुक्रमणिका


१. गोष्ट हजाराच्या नोटेची - सिद्धी चव्हाण

२. एका लग्नाची काय माहिती कितवी गोष्ट -अर्चना गवस/चौधरी

३. मन उधाण वाऱ्याचे- वैशाली चाटे

४. कुसुम- पल्लवी कुलकर्णी/ सुकळीकर

५. घुमणं (घुमने) - सिद्धी चव्हाण

६. परात्पराय नमः - अर्चना गवस/चौधरी

७. जुळून येती रेशीमगाठी - वैशाली चाटे

८. डेटिंग बिटिंग - पल्लवी कुलकर्णी/ सुकळीकर


*****

# गोष्ट हजाराच्या नोटेची

'काही दिवसांपूर्वी गावी कोकणात जाणं झालं, आधी माझ्या सासरच्या गावी मग मामाच्या गावी जाण्याचा योग आला.

माझ २ महिन्याचं बाळ हातात घेऊन उंबरा ओलांडून मी आणि माझा नवरा आम्ही घरात प्रवेश केला. दारात आजी तिष्टत उभी होती, अगदी रखुमाईसारखी. भाकर-तुकडा अंगावरून काढून तिने माझ्या डोळ्याला पाणी लावले. तोंडावरील कापड बाजूला करून लहानग्या पणतीच्या डोळ्याला पाणी लावताना तिचे डोळे भरून आले होते. पहिल्यांदाच आपल्या परतुंडाच तोंड बघत होती ती. त्यात तिच्या लाडक्या नातीची मुलगी. म्हणजे तिच्या काळजाचा तुकडा. अलगत आपला सुरकुतलेला हात माझ्या पिल्लुच्या डोळ्यांवरून फिरवत तिने गोडं पापा घेतला. तेवढ्यात माझ्या माऊने आपले इवलेसे किलकिले डोळे उघडले. एकटक आजी नंतर माझ्याकडे बघत बसली. आजोबापण नातीच्या मुलीला बघण्यासाठी धडपडत पुढे आले होते. काय करू आणि काय नाही असं झालं होता त्या दोघांना.'

वाटणाचं वरण आणि गावठी भात, मोडाच्या वालाचं बिरडं, अळूवडी, हळदीचं पानं घालून केलेली तांदळाची खीर, पापड-कुरडया असा जंगी बेत होता. नको नको म्हणत असताना आजीने स्वतःच्या हाताने सगळं बनवलं होतं. जेवणाची पानं मी लावायला घेतली. सोबत पाण्याचा तांब्या सुध्या भरून ठेवला. जवळपास आज सात वर्षांनंतर मी आजोळी गेले होते. आजीच्या हाताला रुची वेगळीचं. सध्या वयोमानानुसार व्यवहाराच्या गोष्टी मामा स्वतः करतो, पण 'जिवंत आहे तोपर्यंत स्वयंपाक मीच करणार', असं ती ठणकावून सांगते.  अजूनही थोडंफार मीठ किंवा तिखट असं काहीही कमी

जास्त झाल्याचं कोणाच्या नजरेत नाही. जेवणाची अगदी स्वयंसिद्धा म्हणा ना|

नात , नात जावयाचा आणि परतुंडाचा चांगलाच पाहूनचार रंगला होता. जेवण-खावन आटोपून निवांत बसलो, गप्पाटप्पा रंगात आल्या होत्या. कितीतरी गप्पा आणि जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. दुपारची संध्याकाळ केव्हा झाली कुणाला समजलेच नाही. जुने गमती जमतीचे किस्से रंगले. खाण्याची असो अथवा इतर गोष्ट पहिल्यापासून आजी प्रत्येक गोष्ट सगळयांना वाटून द्यायची, कुणी त्यावेळी उपस्थित नसेल तर त्याच्या वाट्याचे राखून ठेवायची. कोणी दुपारी जेवायला नसेल तर त्याच्यासाठी थोडी खीर किंवा पुरणपोळी असा नवीन केलेला पदार्थ राखून ठेवणे ही तिची सवय अजूनही गेली नाही. दरवर्षी दिवाळीला आजोबा आम्हा नातवंडांसाठी फटाके आणायचे. काही कारणास्तव एका दिवाळीला मी आजोळी जाऊ शकले नाही. नंतर येईन म्हणाले आणि ख्रिसमसच्या सुट्टीत गेले. दिवाळी होऊन बरेच दिवस लोटले होते, पण माझ्या वाट्याचे फटाके आजीने तसेच ठेवून दिले होते. हिवाळ्यामध्ये थोडे थंड पडलेले ते, पण तिने माझ्या हातात दिले तेव्हा काय सांगू कोण आनंद झाला होता मला ते.

आम्ही साखरपावरून म्हणजे माझ्या सासरच्या गावावरून चिपळूणला माझ्या आजोळी आलो होतो. कारने प्रवासास दोन अडीच तास लागतात म्हणून आम्ही सकाळी लवकर निघालो. बाळाला अंघोळ घालणाऱ्या काकू संध्याकाळी यायच्या त्यामुळे मी माझ्या बाळाला अंघोळ न घालताच घेऊन आली आहे, हे आजीला समजले तेव्हा तिने कोमट तेलाने मसाज करून माझ्या बाळाला मस्त अंघोळ घातली. डोक्यावर तेलाचे माकू घातले होते.

हे पाहून माझ्या लहानपाणीची प्रत्येक आठवण माझ्या डोळ्यासमोर तरंगत होती.  काळ सरकला, वेळ पळत होती, वय वाढले, पण आजी अजूनही मानने तशी आणि तशीच. आधी मुलांसाठी, नंतर नातवंडांसाठी, आता परतुंडांसाठी तेच प्रेम.

आता परतीच्या प्रवासाला निघायचं होत. पण मन मात्र अजून तिथेच आडून बसलं होत.

‘माझं अख्ख बालपण इथे हरवलं, फुटलेल्या नारळाच्या करवंट्या घेऊन
इथेच लाल मातीत लगोर उभी राहायची,
इथेच आमचा लपाछपीचा डाव रंगायचा नारळी केळीच्या बनात.
बाप्पा असो किंवा दिवाळीची सुट्टी, अगदी आमची होळी सुद्धा इथेच
आणि आजीच्या मांडीवर बसून रोजचेच अभ्यंग स्नान देखील इथेच
उघड्या परसात.
का झालो मोठे? का बळ आले पंखात? परतीची आस असूनही विकतच्या
बेड्या बसवल्या पायात.’

संध्याकाळी आजी-आजोबांच्या पाय पडून आम्ही निघालो. आजी बाळाला घेऊन दारातच उभी होती. " पुन्हा केव्हा येशील ग? " एवढंच बोलून तिने आपला हुंदका आवरला. " हे माझ्याकडून माझ्या कष्टाचे, किती वर्षापासून जपून ठेवलेले पैसे. माझ्या पणतीला भेट." बाळाच्या हातात हजाराची एक नोट ठेवून तिने दारातूनच निरोप घेतला.
" अगं आजी कशाला पैसे, ठेव ते आधी." म्हणत ते पैसे मी तिला परत करण्यासाठी प्रयन्त करत होते, पण बाळाने आपल्या मुठीत ती नोट अगदी

घट्ट पकडली होती. मी एकदा आजीकडे आणि एकदा माझ्या नवऱ्याकडे आश्चर्याने पहिले. त्याने मानेनेच नकार दिला आणि मी गोंधळले. हा नाही का म्हणतोय? ते कळेना. त्याने गपचूप त्याच्या खिशातील काही पैसे काढून माझ्याकडे दिले, आजीला देण्यासाठी. आजी घेत न्हवतीच पण मी ते तिच्या हातात टेकवत तिथून निघाले.

गाडी स्टार्ट केल्याकेल्या मी लगेच त्याला प्रश्न केला. " नाही का म्हणालास? ते पैसे परत करून तिला सांगायला पाहिजे ना?"
"त्याने बाळाच्या हातातून पैसे काढून माझ्याकडे दिले. " हे बघ ही जुनी हजाराची नोट आहे, दोन वर्षे झाली करन्सी बदलून, म्हणजे आपलं लग्न झालं तेव्हापासून आजीने ही नोट तिच्या होणाऱ्या परतुंडाच्या नावाने बाजूला काढून ठेवली असणार, तू आजीला हि परत दिली असतीस तर तिला किती वाईट वाटलं असत." त्याच म्हणणं बरोबर होत, तरीही मी त्याला माझं मत ऐकवलं.
" मला तेव्हाच समजल होतं की ही जुनी नोट आता चलनात नाही, पण म्हणून मी ही आजीला परत करत नव्हते, तर तिला सांगणार होते, कि काही नोटा आता बंद झाल्यात, बाहेर कुठे गेल्यावर असे पैसे चालणार नाहीत, तेव्हा तिची अडचण व्हायला नको म्हणून."

त्याने हातातील मोबाइलवर नुकताच डायल केलेला मामाचा कॉल मला दाखवला. " तुझे मामा बाहेर गेले आहेत, तू आजीशी बोलत होतीस तेव्हाच त्यांच्याशी बोलणं झालं माझं. नोटांबद्दल त्यांना विचारलं तेव्हा समजलं. ‘आत्ता आजी एकटी कुठे बाहेर जात नाही, आणि पैश्याचे सगळे व्यवहार आता मामा बघतात. त्यामुळे काही प्रॉब्लेम येणार नाही. आणि

विशेष बाब म्हणजे नोटांमधील फरक आता आजीच्या लक्षात येत नाही. त्यामुळे त्यांना सांगूनही काही फायदा झाला असता असे मला वाटत नाही.'' तो पुढे बोलू लागला.

'' आपल्याकडे परतुंडाच तोंड पाहिल्यावर त्याला काहीतरी भेटवस्तू देण्याची प्रथा आहे, त्यासाठीच आजीने ही नोट अगदी राखून ठेवली असणार. म्हणून ही नोट त्यांना परत देणं मला बर वाटलं नाही. त्यांना वाईट वाटण्यापेक्षा, ही नोट एखादी वस्तू आहे असं समजून कायमची तुझ्याजवळ ठेव. "

त्यावेळी काय बरोबर काय चूक मला समजले नाही. आजीचं तिच्या नातीशी असणार प्रेम आणि नातीच्या मुलीशी असणार प्रेम या पुढे ती हजाराची नोट अगदीच नगण्य होती. समोरच्याच्या भावनांचा आदर करणे केव्हाही योग्यच, भावना आणि प्रेम याला पैश्यामध्ये मोजणे शक्य नाही. त्यामुळे जे झाले ते योग्यच, असं मानून मी ती नोट माझ्याकडे जपून ठेवली आहे.

*****


**सिद्धी चव्हाण**

*siddhic1991@gmail.com*

# एका लग्नाची काय माहिती कितवी गोष्ट....

"मला ना फार भीती वाटते, होईल ना सगळं नीट?" मीनलने समीरशी फोनवर काळजी बोलून दाखवली.

"होईल ग, मी सांगितलं ना होईल तर होईलच. तू मला ओळखते ना? ह्या वेळेस आर नही तो पार "समीर तिला परत एकदा समजवायचा प्रयत्न केला. गेल्या 15 दिवसापासून तो फक्त तिची समजूतच काढत होता.आज तीच परत सुरू झालं होतं.

"मागच्या वेळी नव्हतं ना झालं. तू सांगून सुद्धा" तिच्या शंका काही संपतच नव्हत्या. भीतीच किंवा अनिश्चिततेच काहूर दाटून आलं होतं तिच्या मनात.

"बरं, माझं वाक्य बदलतो,तू जर कच नाही खाल्ली तर नाही होणार गडबड." आता समीरचा पारा चढायला लागला होता.

"अरे, मी घाबरून गेली होती तेव्हा.." मीनलला समीरच्या वाक्याचा अर्थ कळत होता.मागच्यावेळी तिच्यामुळेच गडबड झाली होती आणि त्याच गोष्टीची भीती परत एकदा तिच्या बोलण्यातून जाणवत होती.

"आता नको घाबरू, तेव्हाची परिस्थिती वेगळी होती, आता परिस्थिती एकदमच वेगळी आहे,आता आपली आर्थिक स्थिती फार वेगळी आहे. काही worst झालं तरी आपण दोघे सुखी राहू शकू.काही गडबड नाही होणार." समीर आपला तिला धीर देतंच होता.

"आई बाबांचं काय? त्यांना सहन होईल का?" शंकाचे ढग काही पुढे सरकतच नव्हते.

"त्यांचीच तर idea आहे, त्यांच्यामुळे करावं लागतं आहे हे सगळं.. सुखा सुखी झालं असतं लग्न पण त्यांनाच नाही पसंद मग आता करा म्हणा सहन" समीर हळुहळु चिडायला लागला होता.
"काय करायचं आहे सांग?" मीनलने रागरंग बघून आवरत घेतलं
"रात्री 2 पर्यंत सगळे झोपतात, तेव्हा मी तुला घ्यायला येतो . तेव्हा आपण निघुया" समीरने डोकं थंड ठेवायचा प्रयत्न चालू केला. तिला plan explain करायला सुरुवात केली.
"काय झालं, कसला विचार करते आहे?" बराच वेळ उत्तर आलं नाही म्हणून समीरने परत विचारलं.
"तुला तर माहिती आहे ना, मला रात्री उशिरा पर्यंत जागता येत नाही. कॉलेज मध्ये होतो तेव्हा तुझ्याशी बोलता बोलता मी किती वेळा झोपून जायची🙈🙈" मीनलने तिचा प्रॉब्लेम सांगितला.
"अग,काय आहे हे, मी काय माझ्यासाठी करतो आहे का? मलाच लग्न करायचं आहे का तुझ्याशी? तू करतेस ना प्रेम नक्की? करायचं आहे ना लग्न?" समीरचा बांध फुटला एकदम.
"हो रे करते मी तुझ्यावर प्रेम , एक काम करूया ना मी सकाळी येते, तू सांगेल तिथे" मीनल मार्ग काढायचा प्रयत्न करत होती.
"मागच्या वेळी सुद्धा तूच माघार घेतली आणि गोंधळ घातला ह्या वेळी पण तू तेच कर? पळून जाऊन आपलं लग्न होईल ही आशा माझी मावळली एकदम"

आणि त्याने फोन कट केला.हिने एक मोठा श्वास घेतला. तिला कळालं होतच आधी की आता पर्याय नाही पण तरीही काही मार्ग असू शकतो का? म्हणून टाळाटाळ करत होती ती. पण काय करावं, कसं करावं तेच

सुचत नव्हतं. त्याने आणि तिने म्हणजे दोघांनी आपापल्या परीने घरी समजवायचा खूप प्रयत्न केला. एकमेकांच्या घरी सुद्धा बोलून झालं पण नाही. कोणी ऐकायला तैयारच नाही. आता एक मताने सगळं ठरलं आहे तर मी खोडा घालून चालणार नाही हे मीनलच्या लक्षात आलं आणि तिने फोन उचलला.

"अरे, बाबा त्रासून जाऊ नको येते 2 वाजता, मग कुठे जायचं?" मीनलने शांत डोक्याने विचार करून फोन केला.
" ऐक, माझं पण डोकं गरम झालं. एक काम करूया सकाळी 5 ला येऊ का घ्यायला, room बुक केली आहे.8 वाजता सकाळी मुहूर्त आहे." समीरने स्वतः ला कंट्रोल केलं.ह्यावेळेस तरी त्याला प्लॅन successful करायचा होता.
"तैयारी झाली का सगळी? गुरुजी?काही सामान आणायचं का?मंगळसूत्र? मला नवीन earring हव्या होत्या बोलली होती मी तुला? आपण plantinum band घेतले ते कुठे ठेवले आहेस? फार इच्छा होती माझी मागच्या वेळी नाही जमलं तेव्हा. आता जमू शकत ना? आणि designer मुंडावळ्या आणि अंतरपाट पण designer पाहिजे.तुझे माझे कपडे त्या बद्दल बोलायचं राहील की आपलं मागच्या वेळी खरंच"दो जोडी" कपडे होते आता नको ह.. तसं" मीनलची गाडी भलत्याच रस्त्यावर सुटली होती. समीरला कुठे आणि काय करू तेच कळत नव्हतं.स्वतःला नेमकं काय हवं ह्याचा विचार करायची वेळ आली होती आता. हा सगळा trailor आहे हे त्याला कळत होतं. "मुहूर्त" ह्या एका शब्दावर ही मुलगी सगळंच विसरली.तिचे आई वडील, भीती, शंका एका बाजूला आणि लग्नाची तैयारी एकदम सर्वोच्च.

"माझी बाय ग ती, आली की नाही बरोबर स्वतःच्या जागेवर😀😀😀... कोणी काहीही म्हणो mood तो तू ही set करेगी जानू" समीरचा स्वतःचा स्वर बदलला.मीनल खुश तर स्वारी खुश.

"मंगळसूत्र,मुंडावळ्या, अंतरपाट तुला पाहिजे तश्याच आणल्या आहेत.platinum band तर आधीच घेतले ना ग ते बॅगेत चोर कप्प्यात आहे, विसरली का? आणि twinning केलंच आहे आपण ऑलरेडी.सगळं बॅगेत ठेव काही विसरू नको. tension आलं का ग तुला? खूप नको ग घेउ tension, मी खरंच घेईन काळजी सगळ्या गोष्टींची. विश्वास ठेव माझ्यावर, सगळं खुप छान करेन.. आई बाबा पण खुश होतील. आणि एक गोष्ट तू सकाळी 6 ला ये , मला माहिती आहे तुला जागरण नाही जमत ते.8 चा मुहूर्त आहे" समीर खूप खुश झाला.

दुसरा दिवस उजाडला, सगळं काही ठरवल्याप्रमाणे घडलं. गुरुजी आले, अंतरपाट म्हणजे एका पांढऱ्याशुभ्र मांजरपाटावर मध्ये भागी सुंदर,सजलेले असे नवरा नवरी होते, एका कोपऱ्यात रेखीव गणपती होता तर दुसऱ्या दुसऱ्या कोपऱ्यात लक्ष्मी आणि अन्नपूर्णा होत्या.बघताच मीनलची कळी खुलली, मुंडावळ्या तर मोती आणी खड्याची अशी सुरेख गुंफलेली नक्षी होती की जणू समीर आणि मीनलचे एकमेकांत गुंफलेले हातच. Platimum बँड made for each other होते. मंगळसूत्र तर असं नाजूक, "सनल"(समीर+मीनल) पदक असलेलं होतं. सनल एकत्र फारच गोड दिसत होते पण मीनलच्या चेहऱ्यावर थोडं tension डोकवत होतं.

पूजा जशी सुरू झाली तशी तर अढी अजूनच ठळक दिसायला लागली होती. मंगळसूत्र घातलं समीरने, सप्तपदीसाठी गाठ बांधायला गुरुजी उठले आणि मागून जोरात आवाज आला

" थांबा, असं कसं होईल हे लग्न" सनल आणि गुरुजींनी एकदमच त्या दिशेने बघितलं. एक 24 25 वर्षाची सुंदर स्त्री तिथून जोरात किंचाळली होती. तिच्या बरोबर समीर आणि मीनल चे आई वडील आणि सगळेच नातलग येत होते.

त्या स्त्रीने पूजेकडे येत "आई, तुम्ही शाल विसरल्या, गाठ कशी बांधता येईल" मीनलची सून बोलली. मीनलने डोक्याला हात मारून घेतला. "बरं झालं बेटा , ही शाल आणली.तुझ्या सासूने माझं डोकं उठवलं होत केव्हाच...30 वर्षापूर्वी पण असंच हे राहील, ते राहील करत सामान गोळा करत राहिली आणि माझ्या सासूबाईंना हिच्यावर संशय आला, त्यांनी आमची चोरी पकडली. तेव्हा वेगळेच प्रॉब्लेम आले पण सगळ्यांच्या संमतीने आणि देवा ब्राह्मणाच्या साक्षीने लग्न झालं. पळून जायची इच्छा मनातच राहिली म्हणून ठरवलं लग्नाच्या 25 व्या वाढदिवसानिमित्त करूया पळून जाऊन लग्न... पण सुनबाई, तुझं आणि सम्यकच लग्न आलं त्याच दरम्यान,मग पुढे कधीतरी बघूया असा विचार केला. आई बाबा बोलले ह्या वेळी तुम्हाला पाहिजे तसं करा लग्न म्हणून ह्या वर्षी तरी पळून जाऊन करूया असं एकमताने ठरलं.म्हणून आता लग्नाच्या 30 व्या वाढदिवसाला विचार केला तर 75% तरी केलं आम्ही पळून लग्न. माझ्या मीनलला टेन्शन कसलं तर शाल कुठे गेली? आता परत एकदा plan करतो 50 व्या वाढदिवसाला, तेव्हा 100%पळून जाऊन करू आम्ही लग्न" समीरने हे वाक्य फेकताच सगळे जण

जोरजोरात हसायला लागले.मीनल आपली आजही लाजतच होती. एकदम गोड, इतकी गोड की समीर तिच्या बरोबर पुढचे 100 जन्म पण पळून जायला तैयार झाला. त्या दोघांकडे बघून असं जाणवलं की त्यांच्या लग्नाच्या अश्या खूप साऱ्या गोष्टी आहेतच आणि पुढेही येतंच राहणार...तसेही एकाच लग्नाच्या खूप साऱ्या गोष्टी असतात ना...

*****


अर्चना चौधरी\गवस - 9158982904

archanachaudhari20079@gmail.com

# कुसुम

गरिबाला कसल्या आल्यात भावना आणि फीलिंग्स? ही उच्चभ्रू लोकांची थेरं! आपण पडलो स्वभावाने आणि पैशाने गरीब. सतत मन मारून जगणारे किडे. बालपणी मोठ्यांच्या शिव्या खायच्या, त्यांना दबकून राहायचं, तरुणपणी शक्य असेल तितकं शिक्षणात स्वतःला झिजवायचं. मग एखादी सरळसोट चाकरी, लग्न, मुलं आणि म्हातारपणी मिंधं होऊन जगायचं!

ही काय life आहे?

सतत कुणालातरी वचकून राहायचं, कधीच मोकळेपणा मिळाला नाही, आणि आता ह्या वयात जिथे आम्हाला रिटायरमेंट ही सुद्धा शिक्षा वाटू लागलीये तिथे भावना समजून घेण्याची नाटकं कशाला?

नकोच.

सदाशिवराव तावातावाने बोलत होते.

स्वतःशीच

बाथरूमच्या आरशात पाहून.

त्यांची ही जुनी सवय होती. मनातलं सगळं सत्य फक्त आरशाला सांगायची. इतर कुणालाही त्यांच्या मनात काय चालूये ह्याचा थांगपत्ता लागत नसे. आतल्या गाठीचे म्हणून ओळखले जात असले तरी ते स्वभावाने मऊ आणि निरूपद्रवी होते. त्यांची पत्नी सुशीलादेवी मात्र मुलखाच्या बोलघेव्हड्या! सतत टकळी चालूच.

ह्या स्वभावाने सुशीलादेवींनी अनेक तर सदाशिवरावांनी शून्य मित्र जोडले होते.

नाही म्हणायला सदाशिवरावांचा एक गणू नावाचा बालमित्र होता पण मैत्रीचं वारं एकतर्फी होतं. म्हणजे गणू त्यांच्याजवळ मन मोकळं करायचा,

तर कधी कचाकचा भांडायचा सुद्धा! पण गणूचा सदा मात्र ढिम्म. सदाशिवराव त्याला अडीअडचणीत मदत करीत, त्याला सांभाळून घेत. पण स्वतः मात्र कोरडेच राहत. अशा स्वभावामुळे मनात भावना दाटून त्यांचा सतत कोंडमारा होत असे.

आताही असंच झालं होतं. घरी छोट्यामोठ्या कुरबुरी झाल्या की सर्व परिस्थिती सदाशिवराव सांभाळून घेत. मात्र त्यांना सांभाळून घ्यायला कुणीच नव्हतं. सुशीलादेवी होत्या पण त्यांचं लक्ष सतत बाहेर कुठेतरी असे. कुणाच्या घरी काय चालूये, कुणी काय नवीन खरेदी केली, कुणाकडे लग्न किंवा समारंभ आहे वगैरे वगैरे.

अशा स्वभावामुळे त्या स्वतःच्या घरी कमी आणि बाहेरच जास्त रमत असत. इतके दिवस सदाशिवरावांना काही ह्या स्वभावाचा अडसर वाटला नाही. पण आता रिटायरमेंट नंतर तरी बायकोने घरात असावे आपल्याला वेळ द्यावा असे त्यांना वाटत असे. अर्थात त्यांनी हे बोलून तर दाखवले नाहीच पण बायकोला जाणवू ही दिले नाही. त्यामुळे ते अधिकच एकटे पडत चालले होते.

आता आर्थिक दृष्टीने जरी बरे दिवस आले असले तरी परिस्थिती तितकीशी चांगली नव्हती. मुलगा आणि सून नौकरीच्या बळावर संसार चालवत. पुढे मुलांच्या शिक्षणासाठी उपयोगी येतील म्हणून ते दोघे बचतीवर भर देत. त्यामुळे घरात विशेष चैनीच्या वस्तू नव्हत्या. सदाशिवरावांना विशेष छंद किंवा आवडही नव्हती की ज्यात मन गुंतून राहील. त्यामुळे त्यांची छोट्या छोट्या कारणावरून चिडचिड होत असे.

आजही असेच झाले. घरातील सर्वजण आपापल्या उद्योगाला गेले होते. सुशीलाबाई स्वयंपाक घरातील कामे आटपून जरा निवांत पहुडल्या होत्या .

सदाशिवरावांना चहा हवा होता पण तो करून घ्यायचा कंटाळा आला म्हणून त्यांनी बायकोला उठवलेच.

"अगं, ऐकतेस का, मला अर्धा कप चहा करून दे बरं."

"अहो, आताच पडलीये मी. सकाळपासून मेली मरमर सुरुये. ते दिसत नाही का? आताशा होत नाही हो सतत काम माझ्याने , आयुष्यभर हेच केलंय.जरा आराम करू द्या,थोड्या वेळाने उठले की देते करून. "

"मला काही हवं असलं की बरोबर तुला आराम करायचा असतो " सदाशिवराव ओठातल्या ओठात पुटपुटले. वर जोरात म्हणाले, " ठिक आहे मी घेतो करून "

ते चहा करायला गेले आणि गडबडीत पाय घसरून पडले. फार काही लागलं नाही पण पाय मुरगाळला आणि ह्या आता सुशीलाबाईंची चिडचिड झाली. आठ दिवस घरात धुसफूस झाली. सदाशिवराव घुम्यासारखे पडून असले तरी मनात भडकलेले होते. पाय बरा झाला त्याच दिवशी त्यांनी दुपारी छोटीशी bag भरली आणि हळूच घरातून सटकले.

कुठे जायचं, काय करायचं काहीच planning नव्हतं. खिशात थोडे पैसे होते. त्याच्या भरवशावर ते घरातून बाहेर पडले आणि थेट एका random st बसमध्ये जाऊन बसले. घरी निरोपाचा मेसेज करून ठेवला कामानिमित्त बाहेर जात आहे असा आणि मोबाईल बंद केला.

घराचे आणि कुटुंबाचे विचार मनात बिलकुल येऊ द्यायचे नाहीत असं त्यांनी ठरवलं आणि जाणीवपूर्वक खूप जुन्या गोष्टी आठवू लागले. त्यांच्या कॉलेजच्या काळात शिकत असताना एक मुलगी त्यांच्या वर्गात होती,

कुसुम नावाची! तिची आठवण आली आणि सदाशिवराव व्याकुळ झाले. होणारच होते, कारण ती त्यांचं पहिलं वहिलं प्रेम होती. होतीच म्हणावं लागेल कारण सध्या त्यांचा संपर्क नव्हता. जणू ती कुठेतरी दूर हरवून गेली होती. निखळ हास्य मिरवणारी, नाजूक बांध्याची, वेणीचा शेपटा रुळवत चालणारी, थोडीशी सावळी, मनमोहक, कुरळ्या केसांची कुसुम नेहमी प्रफुल्ल दिसत असे.वर्गात फार मुली नव्हत्या. त्यामुळे कुसुम गरज पडली तर मुलांशी बोलत असे. त्यात सदाशिव म्हणजे अत्यंत शांत, स्कॉलर मुलगा असल्यामुळे तिला त्याच्याशी बोलायला बरं वाटत असे.

सहवासाने हळूहळू त्यांच्यात प्रेम निर्माण झाले. पण...

प्रत्येक प्रेमकथेत पण यायलाच हवा का?

St थांबली. सदाशिवराव उतरले. ते त्यांच्या कॉलेजच्या गावी आले होते. ह्याला योगायोग म्हणावं की नियती? मघाशी त्यांनी विचाराच्या तंद्रित तिकीट घेऊन टाकलं होतं ते कुठलं ह्याकडेही त्यांचं लक्ष नव्हतं.

आलोच आहोत तर कुसुमला शोधावे का? त्यांच्या मनात आलं.

त्यांच्याजवळ स्मार्टफोन होता पण त्यांना तो फार काही वापरता येत नसे. त्यांनी जुन्या पद्धतीने जायचं ठरवलं.

त्यांचे अंतर्मन सांगत होते, कुसुम सुखात आहे. तसेच ती नक्कीच भेटायला येईल आज त्यांना. पण हे सगळे कसे घडेल ह्याचे त्यांच्याजवळ तर्कशुद्ध उत्तर नव्हतं. काहीच न सुचल्यामुळे ते रस्ता दिसेल तसे चालत राहिले.

काही खाल्ले नसल्यामुळे त्यांना भुकही कडकडून लागली होती. पण तिकडे दुर्लक्ष करत दिशाहीन अवस्थेत ते वाट दिसेल तसे चालत राहिले.

त्यांनाच माहिती नव्हतं कुठे पोचणार ते. शेवटी थकून ते एका बाकावर जाऊन बसले. हा बाक त्यांच्या भुतकाळातील परिचयाचा होता.

ह्या बाकावर कॉलेज जीवनातील सुखादुःखाचे क्षण त्यांनी घालवले होते. जवळच छोटीशी बाग आणि चहाची टपरी होती.आपसूकच तिकडे पावली वळली होती. आपण असे फिरतोय हा शुद्ध मूर्खपणा आहे असे आता त्यांना वाटू लागले.
त्यांनी स्वतःचे खिसे तपासले.

काही सुट्टे पैसे होते. त्यांनी चहा घेतला. मन अजूनही कुसुमच्या आठवणींनी व्याकुळ झाले होते. चहा गोड लागेना. मनात काहीतरी दाटून आले होते.ते तसेच विमनस्क अवस्थेत बसून राहिले. जुन्या आठवणींनी मनात फेर धरला होता.

इकडे घरी सगळेजण सदाशिवरावांना शोधत होते. फोन बंद असल्यामुळे काहीच पत्ता लागत नव्हता. सगळे काळजीत होते. सुशीलादेवी देवासमोरच करुणा भाकीत बसल्या होत्या.
वाट पाहण्याशिवाय त्यांच्या हातात काहीच उरले नव्हते.त्यांच्या डोळ्यातून अश्रूधारा वाहू लागल्या. आपलं नवऱ्याकडे जरा दुर्लक्ष झालं ही जाणीव त्यांना झाली आणि त्या अधिकच बेचैन झाल्या.
त्यांना कुठे शोधावे असा विचार सुशीलादेवी करत होत्या. काही ठिकाणी त्यांनी calls करून पाहिले. पण सदाशिवराव कुठेच नव्हते.त्यांना आता खूपच काळजी वाटू लागली होती आणि जरा टेन्शन ही आलं होतं. तशा त्या खंबीर होत्या पण हा प्रसंग ह्यापूर्वी कधी आला नव्हता आणि कठीण, अनपेक्षित होता.

इकडे सदाशिवरावही बेचैन झाले होते. काय करावे काहीच सुचत नव्हते त्यांना! त्यांनी मनातून कुसुमला आर्त साद घालायला सुरुवात केली. ज्याप्रमाणे एखादा निस्सीम भक्त परमेश्वराची करुणा भाकतो, त्याप्रमाणे ते तिला बोलावू लागले. आता त्यांना तिची नितांत गरज होती. पण ती कशी, कुठून येणार, काहीच कल्पना नव्हती.

"कुसुम, ये ना गं. तुझी खूप आठवण येतेय. या क्षणी तुझ्याशिवाय मला कुणीच सावरू शकत नाही. तूच आहेस गं ती माझ्या हृदयाची राणी! हा प्रपंच, संसार हे फक्त वास्तविकतेचे खेळ आहेत. माझ्या मनात फक्त तूच वसली आहेस. माझ्या मनाच्या प्रत्येक अवस्थेला तू जाणतेस. माझ्या बोलण्याच्या आवाजावरून, चेहेऱ्याच्या बदललेल्या लकेरीवरून तू ओळखायचीस की माझं काय बिनसलंय ते आणि आज मी मानसिकरित्या कोसळलोय गं! खूप काही दाटलंय मनात. कुठे बोलू काय बोलू. तू हवी होतीस गं. ये ना कुसूम." असं सदाशिवराव मनात बोलत होते.

इतक्यात कुणाच्यातरी येण्याची चाहूल लागली. त्याचबरोबर बांगड्यां किणकिणल्या , पैंजणाचा मंजुळ छुमछुम ध्वनी ऐकू आला. सोनचाफ्याचा सुगंध दरवळला.

सदाशिवरावांनी वर पाहिले. त्यांच्या डोळ्यात अश्रू होते. स्पष्ट दिसेना. अंधुक दृष्टीला एक परिचित स्त्री दिसली.नजरेत भरली ती तिच्या केसांची चंदेरी बट! अजूनही तितकेच सुंदर असणारे केस वयोमानानुसार विरळ झाले असले तरी त्यांचा छान अंबाडा बांधला होता. त्यावर नाजूक सोनचाफा खोचलेला होता. त्याचा दरवळ तिचे आगमन प्रसन्न करून सोडत होता. कानात खड्यामोत्याच्या कुड्या लखलखत होत्या.तिने

डाळिंबी रंगाची सहावारी गोल साडी नेसली होती. त्याला गुलबट सोनेरी काठ होते.
हातात हिरव्या काचेच्या बांगड्या व मध्ये एक नाजूक सोन्याचे कंकण होते.
"हे तेच कंकण आहे ना?" सदाशिवराव तिच्याकडे भरलेल्या डोळ्यांनी पाहत जड आवाजात म्हणाले.ती गोड हसली.
" हो सदा, हे तेच आहे. कंकण ओळखलस आणि मी? मला विसरलास? इतक्या दिवसांत एकदाही आठवण नाही आली माझी "
तीही भावनिक झाली होती.

"कुसुम, अगं आज मनातून तुला साद घालत होतो आणि तू आलीस. कसे कळते गं तुला सारे "
"हो सदा, आधीपासूनच असं आहे. मला समजत आलंय. पण मीही कर्तव्यात गुरफटले रे. तू तर अगदीच संसारी माणूस! मला कधी भेटायला आला नाहीस की कधी बोलवले नाहीस. मीच येत असे अधून मधून थोड्या वेळासाठी, एकांतात, मन मोकळं करायला. "
तिचे बोलणे तोडत सदाशिवराव म्हणाले, "हो आणि तुझे ते येणे म्हणजे शुष्क वाळवंटात वर्षाराणी प्रसन्न होऊन वरदान देत आहे असे वाटत असे. माझ्यासाठी जीवनामृतच ते!त्या अनमोल क्षणांना वेचत आलोय मी. तेच सहाय्यक ठरलेत ह्या जीर्ण कुडीमध्ये प्राण टिकवण्यासाठी!"

"असं का म्हणतोस?
आणि किती ते साहित्यिक बोलणं रे. अजूनही जुन्याच पिढीचा आहेस तू. कधी नवीन जगात डोकावून बघ. किती cool आहे नवीन पिढी पाहिलंस का?

अरेच्चा cool वरून आठवलं, तुझा चहा गार झाला की. चल, काहीतरी खाऊन घेऊ आपण. मी हे थालीपीठ आणलंय तुझ्या आवडीचं आणि सोबत घट्ट कवडीचं दही, ते खा बरं."

" हो गं कुसुम, पण एका अटीवर. तू मला भेटायला वारंवार यायचंस आणि cool कसं व्हायचं हे शिकवायचं!"

" ते मात्र बघावं लागेल हा सदाशिवराव, तुमची प्रिय पत्नी सुशीलादेवी यांना तुम्ही अनुमती दिली तरच ते शक्य आहे "

"नाव काढू नकोस तिचं. तिला माझ्यासाठी वेळच नाही, इतर जगासाठी आहे."

"सदा अरे, तूच समजून घे तिला. तिचं चुकलं तर रागाव सुद्धा! तिला कळेल, चिडणार नाही ती. पण असा अबोला धरून घर सोडून येऊ नको न सांगता सवरता! भीती वाटते हो "

असं बोलून झाल्यावर कुसुम उर्फ लग्नानंतरची सौ. सुशीलादेवी हिच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या. तिला आता ना दुखवण्याची आणि वेळोवेळी मनातलं बोलून स्वतःला आनंदी ठेवण्याची मनोमन शपथ सदाने घेतली.

झाडांची सावली एका दिशेने कलू लागली होती व सदा कुसुमचे प्रेम पुन्हा एकदा बहरू लागले होते.

*****

**पल्लवी कुलकर्णी/ सुकळीकर**

kulkarnipallavi4@gmail.com

# "मन उधाण वाऱ्याचे"

‘आज खूप वर्षांनंतर शाळेतील सवंगड्याचं get-together ठरलं. इतक्या वर्षांनी बालपणीचे मित्र मैत्रिणी भेटणार यातच सगळे खुष झाले. अनामिकाही खुप खुश होती की तीची जीवलग मैत्रिण तिला भेटणार होती अन् भेटणार होता तो.’

तो म्हणजे 'राहुल' नाम तो सुना ही  होगा ना ....मस्तीखोर अन् तितकाच हुशार, सगळ्या शिक्षकांचा आवडता अन् प्रत्येक मुलीच्या मनात त्याच्याबद्दल  softcorner असावा  असा, अनामिकाच्या मनातही होताच .३री,४थी पासून दोघं एकाच वर्गात होते ,पण राहुल अनामिकाशी कधी बोलणं तर सोडा, साधं ढुंकूनही पाहत नव्हता. अनामिकाला वाटायचं वर्गात एवढ्या सुंदर मुली असताना तो माझ्यासारख्या जाड्या -ढोल्या  मुलीकडे का बघेल?अन् का बोलेल? तरीही त्याला काही झालं की त्रास मात्र हिला व्हायचा. इतकी वर्ष एकच वर्ग,एकच tution,कसला कार्यक्रम असला की एकत्र,पण कधी साधी नजरानजर सुद्धा नाही ,त्याला तर  हिच घर सुद्धा माहीत नसणार, पण हिला त्याच्या घरासहीत घरातील प्रत्येक व्यक्ती माहीत होती.

अनामिकाच्या सगळ्या मैत्रिणीं बरोबर राहुल बोलायचा पण अनामिकाशी नाही. का कुणास ठाऊक? हीला नेहमी वाटायचं, आपण बेढब असल्यामुळे असेल कदाचित, म्हणून ही दुर्लक्ष करायची. मनातली गोष्ट कधी जीवलग मैत्रिण अनुष्काला पण नाही सांगीतली. एकदा एका नाटकांसाठी अनुष्का ,राहुल, पुजा आणि अनामिका एका केंद्रावर गेले होते . तिथेही तेच राहुलचं दुसऱ्याच मुलींकडे लक्ष,१०वीला दोघांचं परीक्षा केंद्रही

एकच पण साधं वर्गातील मुलगी म्हणून best of luck सुद्धा नाही केलं.म्हणजे अनामीकानेही कधी तो प्रयत्न केला नाही.

एकदा वर्गात मुलांनी दंगा केलेला म्हणुन क्लासटिचर वर्गात आल्या आणि त्यांनी राहूलला उभं केलं , त्याला त्या मारणार तेव्हा फक्त त्याने अनामिका कडे पाहीले. त्या नजरेत नेमकं काय होतं हे सांगण्याची ताकद शब्दात नाहीच . तो मूक संवाद आठवणींच्या गाभाऱ्यात कायमचा विसावला.

१० वी झाली मग अनामिका अन् राहुलचं कॉलेज बदलले . मग काही नंतर contact नव्हता.अनामिकाचं लग्न झालं नवरा छान मिळाला , कधी काही कमी पडू देत नव्हता,दोन मुलं झाली, अनामिकाचा छान सुखी संसार चालू होता.

काही दिवसांनंतर शाळेतील मैत्रीणींशी contact झाला मग शाळेतील मुलामुलींचे ऑनलाईन get together ठरले. त्यात फार कमीच मूलं जॉईन झाली.अनामिका पण जॉईन झाली. तेव्हा देखील राहुल साधं hii सुद्धा नाही म्हटला तीला, अजूनही शाळेत होता तसाच दिसतो अशी कमेंट अनामिका ने दिली तरिही त्यावर काहीच नाही बोलला.अनामिकाच्या मनात राहुलला पाहून परत शाळेतल्या आठवणी जाग्या झाल्या. पण अनामिका पुन्हा संसाराच्या व्यापात गुंतली. अनामिकाने facebook वर कमेंट केली तरीही काही रिप्लाय नसायचा राहुलचा.

काही दिवसानंतर मग get - together ठरलं. बेंच पार्टनर जिवलग मैत्रीणी अनुष्का - अनामिका भेटल्या. अनामिका ने स्वतःला छान maintain ठेवलं होतं , त्याबद्दल सगळ्या मैत्रिणी तारीफ करत होत्या. सगळे वेळेवर आले होते.अनामिकाचे डोळे मात्र राहुलला शोधत होते.जरा वेळाने राहुल ,राज,किरण...आले. अनामिका पण यावेळेस मुद्दाम राज

आणि किरण सोबत बोलली. तिने राहुलकडे बघीतल पण नाही , राहुल मात्र सारखं तिच्याकडेच बघत होता.
सगळ्यांचं introduction, game चालू होते तरीही मध्ये मध्ये राहुल अनामिका सोबत बोलण्याचा प्रयत्न करत होता.राजला सोबत घेऊन मुद्दाम अनामिकासोबत बोलत होता. अनामिकाला ते जाणवत होतं. मनात खूप छान वाटत होतं की इतकी वर्ष मला जो आवडत होता तो आज स्वतः माझाशी बोलतोय.ती खूप खुश होती. अनामिका तिचा मोबाईल मध्ये सगळ्यांचे फोटो काढत होती. तेवढ्यात राहुल तिच्याजवळ येऊन म्हणाला,"मला तुझा सोबत फोटो काढण्याची खूप कधीची इच्छा आहे काढु का?" तिला काही सुचायच्या आधीच त्याने तिचा मोबाईल घेतला अन् फोटो काढला. अनामिका अनुष्काकडे गेली तिला सांगितलं की राहुल अस विचारतोय म्हणून
अनुष्का:"करणारच ना, तसही त्याला तू शाळेतल्या दिवसापासून आवडायची"
अनामिका:"काय?" ती फक्त चक्कर येऊन पडायची बाकी होती.
अनुष्का:"हो, तो बावळट मला किती वेळा येऊन सांगायचा आणि तुझ्याशी बोलायला घाबरायचा."
अनामिकाला काही सुचायचं बंद झालं. काय बोलते आहे ही?
बहुदा काहीतरी गोंधळ असावा म्हणून अनामिका ने तिला परत विचारलं.
अनुष्का:"नाहीतर काय, अग नाटकासाठी गेलो होतो तेव्हा तर डोकं उठवलं होत त्याने माझं, तुमचं परीक्षा केंद्र एक आला तेव्हा पार्टी दिली होती 1 rs ice cream ची 🤣🤣.शाळेत सतत त्याला तुझी माहिती हवी असायची.त्याला तुझ्या बहिणी काय करतात, पप्पा कुठे काम करतात पासून तुझं गाव सगळं माहिती होत. बोलायला त्याने शाळेचे 7 वर्ष आणि

आता हे 20 वर्षे लावले. मूर्ख कुठचा ऑनलाइन भेटलो तेव्हा पण तू बोलली तेव्हा मला फोन लावला तेव्हा इतका झापला मी त्याला. "देवाची कृपा अक्कल आली."

अनामिका:"अग, तो तर माझ्याकडे बघायचा पण नाही ना ग?"

अनुष्का:"तो तसाच आहे, मला म्हणायचा तुला कधी सांगू नको, आणि तू तर एवढी strict होती की आपलं कधी याविषयी बोलणंच झालं नाही. कसली शिस्तीत राहायची तू,कोणी हिंमत तरी कशी करणार, अजूनही बरेच जण असतील.देवालाच माहिती".

अजूनही काही बोलल्या असत्या त्या दोघी ,तेवढ्यात राजने मध्येच dialogue मारला.

"आज ही तुम्हीच दोघी बोलत राहणार का? शाळेत पण तेच आणि इथे पण" हसून विषय दुसरीकडे वळला.

पुर्ण get together होई पर्यंत राहुल अनामिका सोबतच फिरत होता, अगदी जेवायला बसताना जागा नसतानाही, अनामिकाच्या बाजूला टेबल लावून जेवायला बसला.वेटर म्हणाला,वाढायला नाही जमणार तिकडे , तर त्याला बोलला ,मी घेईन माझ्या हाताने, पण मला इथेच बसायचं आहे. शाळेत असताना राहुल ने आपल्याकडे साधं बघावं अशी इच्छा होती ती आज 20 वर्षांनी पूर्ण झाली यातचं अनामिकाला आनंद होता.

अनामिकाला घरुन मुलीचा फोन आला "आई कधी येतेस ?" आणि इतका वेळ शाळेतील गोष्टींमध्ये रमलेले मन घरी जाताना मुलांना काय काय न्यायचे आहे याची यादी करण्यात गुंतले .

Get together संपलं आणि अनामिका घरी जायला निघाली.वाटेत गाडीतून जाताना तिने राहुलबद्दल तिला काय वाटायचं ते नवऱ्याला सांगितलं तेव्हा तो म्हणाला प्रत्येकाच्या आयुष्यात हे पहिलं crush असतच माझाही

आयुष्यात होतं. आणि त्याने गाणं चालू केलं कार मध्ये "मन उधाण वाऱ्याचे, गूज पावसाचे
का होते बेभान, कसे गहिवरते...."

*****

**वैशाली चाटे**

*vaishalichate51@gmail.com*

# घुमणं (घुमणे)

"माले निघतेस का गं ? खेळी जमलेत बघ, आईपाषाणी बायच्या मंदिरामागं गाण्याचा आवाज येतोय."

"व्हय, मस्तपैकी तय्यार होऊन निघाली बघ मी." लाल-पिवळ चकाकीचं परकर-पोलकं, हातात हिरव्या बांगड्या आणि पायात घुंगरांचे पैंजण घालून मालन हौसाक्काच्या समोर उभी राहिली. कपाळावरची चंद्रकोर नीटनेटकी करत हौसाने तिची दृष्ट काढली. केसातला गजरा नीटनेटका करत मालन पळतच मंदिराकडे जाऊ लागली.

"चांगल कर्तब दाखव गं, उभा गाव हलला पायजे. शेटलोक येडे झाले पायजेल... येडे. शेवटी हौसाच्या विज्जतीचा प्रश्न हाय."
मालन फडावर पोहोचून नाचगाण्याला सुरुवात झाली होती. इकडे लाकडी माचावर अस्ताव्यस्त आडवी पडून हौसा लोळण घेत तिच्या उधार उज्ज्वल भविष्याच्या विचाराने बडबड करत होती. तिच्या ५०-५५ च्या वयाला न शोभणारी ती रोजचीच अमंगळ बडबड ऐकून समोरच्या वाटेने येणारे-जाणारे 'शी-थू' केल्याशिवाय पुढे जात नसत.
"हातपाय जाग्यावर बसले तर या कवळ्या पोरींना हाताशी घेतलय बेवडीने." म्हणत स्त्रिया देखील तिला अपशब्द ऐकवून पुढे जात.

" छबीदार छबी, मी तोऱ्यात उभी..." हौसाक्का मात्र आपल्या तोर्यातच ठुमकतं, गाणं म्हणत मुरडू लागली.

" अक्का आत चला. लोक बघतात."  लहानग्या पिंकीने त्यांना उठवण्याचा प्रयत्न केला.

" नाय, नाय, नाय, ती माली पैसं लपवती, मला म्हाईत हाय, मोप पैसं मिळतात तिला, आल्या आल्या कशी ओढून घेते बग तिच्याकडून." पिंकीच्या हाताला बाजूला करून हौसाआक्का तिथेच मांडी घालून अडकित्त्याने सुपारी कातरत बसून राहिली.
येणाऱ्या जाणाऱ्यांच्या घाणेरड्या नजरा, अपशब्द आणि शिव्याशाप ऐकत ती आपल्या खांद्यावरचा ढळलेला पदर हातात घेऊन  त्याने हवा खात दारातच बसलेली असायची.

पिंकीला हे रोजचेच. एवढ्या लहानग्या जीवाला गोलगप्प फुगलेली अक्का काय ऐकणार.
***

कोणी मोठी पार्टी माजघरात येऊन बसली होती. आक्काने पाणी देण्यासाठी पिंकीला आत आवाज दिला, पाण्याचा ट्रे टेबलवर ठेवून पिंकी परत आत वळली.
"ही पिंकी| कशी हाय?" पानाचा गुटखा गिळून आपले लाललाल दात विचकत हौसाक्का हिsss हिsss करून हसली.

"चालतंय की, " म्हणत समोरची मंडळी देखील मन डोलावु लागली.

दुरूनच चोरून बघणाऱ्या मालनच्या काळजात पाणी पाणी झा ले. जवळपास दोन वर्षाची असताना शहराला जाणाऱ्या रस्त्यावर पिंकी हौसाक्काला

सापडली होती. गोड गळा, शुद्ध भाषा आणि गोरीगोमटी पिंकी म्हणजे अक्काला आयतीच सोन्याचं अंड देणारी कोंबडी मिळाली. इथे आली तेव्हापासून मालनने तिला आपल्या लहान बहिणीप्रमाणे वाढवली. आता कुठे मोठी व्हायला लागली होती, तर अक्काने मोठ्या पाव्हण्यांकडे तिचा सौदा चालू केला. मालनचा संताप झाला होता. पाहुणे निघून गेल्यावर मालनने आक्काला चांगला जाब विचारला.

" खायला पियाला काय फुकट मिळत का? राधा मेल्यापासून तुम्ही दोघीच राहिलाय. तुझ्या कामाचे पैसे पुरना झालेत, आन पिंकी बी वयात आले. कमवुदे तिला बी. आडकाठी घालण्याचा प्रयन्त केलास तर तुला बी खर्चाला एक पैसे देणार नाय, सांगून ठेवते."

मालनला धमकी देऊन हौसाक्का फणफणत निघून गेली. हौसाक्काशी भांडण्यात काही अर्थ नाही, हे ओळखून असलेली मालन मनाशी काहीतरी धागेदोरे पक्के करू लागली होती.

***

' बघता बघता आठवडा उलटला होता. लहानग्या पिंकीला अजून बाहेरचे जग माहित नव्हते. तिला गावात विशेष कोणी पहिलेले पण नव्हते. मालन बरोबर आता पिंकीदेखील गपचूप फडावर जाऊ लागली होती. नाचगाण्याबरोबर ठुमकाने , मुरडणे असे सगळे नखरे शिकवण्याची जबाबदारी मालनवर होती. आधी नाही नाही म्हणणारी पिंकी देखील आता नियमित जाऊ लागली. नाचगाणी झाल्यावर एखादा पैसेवाला येऊन मालनला त्याच्यासोबत गाडीतून घेऊन जात असे, तेव्हा मात्र पिंकीला रहावत नसे, घरी येऊन ती हमसून हमसून रडायची. सकाळी आलेली मालन आणि तिची झालेली दुर्दशा, लहानग्या पिंकीला सुन्न करून सोडी.'

'आज सकाळी सकाळी हौसाक्काने फर्मान सोडला. " गावात आई पाषाणीदेवीची जत्रा सुरु हाय. कळ लागतात आन देवी कौलं देते. त्यासाठी मोठमोठी मंडळी येत असतात. त्यातलीच एक मोठी पार्टी रात्री फडावर येणार हाय. नाचगाणी झालं कि, त्यांच्यासोबत पिंकीला पाठव. मोप पैसं मिळणार हाईत."

गोदाक्काचे शब्द एकताच मालन भलतीच खुश झाली. हिरवी साडीचोळी, केसाचा अंबाडा आणि कपाळाला ठसठशीत कुंकू लावून तिने पिंकीला तयार केले. पायात जाड घुंगूरमाळा गुंफून ती पिंकीला घेऊन निघाली. नेहेमीप्रमाणेच बाहेर खाटेवर हौसाक्का आपल्या सोनेरी स्वप्नांच्या झुल्यावर लोळत पडली होती. तिला तिचे पैसे ॲडव्हान्समध्ये मिळाले होते. डोक्यावरून पार तोंडापर्यंत पदर घेऊन दारातून बाहेर पडणाऱ्या पिंकीकडे पाहण्याची तसदी देखील तिने घेतली नाही. मालनही 'जाते' असा अस्पष्ट शब्द बोलून निघाली.

' ढम्म... ढम्म... ढोलाचा आवाज घुमत होता. गुलाल उधळले, पालख्या सजल्या, 'आई पाषाणाची, माया आभाळाची..' अश्या गाण्यांनी परिसर दुमदुमून चालला होता. छोटे-मोठे, लहान-थोर असे सगळेच सामील झाले होते. मागे काही अंतरावर तमाशाच्या फडाची मंडळी जमू लागली, आणि पहिल्या नाचला सुरुवात झाली. तसे काही आंबटशौकीन सरकत-सरकत मंदिराच्या मागच्या दिशेला पळाले. पिंकीला मागच्या खोपटात बसवून, इकडे मालन फेर धरू लागली. आलतूफालतू चाळे करत, शिट्या वाजवत लोक पैसे उडवू लागले. कोणी उठून स्टेजच्यावर चढण्याचा पर्यंत करत होते, तर कोणी बसल्याजागी आरोळ्या ठोकू लागले.  फडाचा मुख्या

वाढणाऱ्या गर्दीकडे पाहून चेकळला होता. पैश्याचा पाऊस बघून तो स्वतःच नाचगाण्यात सामील झाला.

रात्र मध्यावर आली. जत्रा पांगली, नाचणारी मंडळी दमुन गेली होती. खाऊ-पिऊन, नाचणाऱ्या अप्सरांना बघून धुंद झालेले बघे आता पेंगूळतीला लागले. पैशाचा ओघ कमी झाल्यावर तमाशाची पालं उठायला लागली होती. मुख्याने येऊन इशारा केला आणि सगळ्यांनी आवरायला सुरुवात केली. मालन आणि पिंकी मध्यावरूनच गायब झाल्याचे लक्षात येताच फडावर गोंधळ उडाला. हौसाक्काला काय उत्तर द्यायचे? याच्या विचारात फडाचा मुख्या आणि त्याचे साथीदार त्या दोघींना शोधण्यासाठी सर्वत्र विखुरले गेले.

इकडे पाषाणीआईच्या मंदिरात घंटानाद सुरु झाला. कळे लागण्याची वेळ झाली होती.
चौफेर पसरलेल्या फडाच्या माणसांनी अखेर पिंकीला गाठले, पण तिला पकडणे आता अशक्य होते. मंदिराच्या समोरील अंगणात माणसाच्या घोळक्याच्या मधोमध ती बसली होती. हुऽऽ हुऽऽ हुऽऽ हुऽऽ हुऽऽ हुऽऽ करत घुमत ती बडबड करत होती. " आई माझ्या पोराला नोकरी कवा मिललं?" म्हणत कोणीतरी तिला दोनपाच पैसे, आणि खणानारळाची ओटी वाहत होते. कोणी तिच्या पायावर लोटांगण घालून नवस बोलत होते.
गोरीगोमटी पोरं, त्यात हिरवी नऊवारी आणि कपाळभर पसरलेलं लाल कुंकू, गळ्यात तुळशीमाळ असं रूप... ती देवीसारखीच भासत होती. पायातल्या घुंगरांच्या माळा तिने केव्हाच्याच फेकून दिल्या होत्या.

" आतल्या देव्हाऱ्यात देवीला कळे लावले आणि एक गाऱ्हाण्याच्या वेळी ही मुलगी मंदिराच्या अंगणात घुमू लागली, अर्धा तास ना थांबता घुमतंच होती. पायातून  रक्त आलं, तरी ऐकेना. कपाळावर हळदी-कुंकवाचा मळवट लावला तेव्हा शांत झाली. "

"हो आणि विचारलेलं सगळं खर खर सांगते बघ. काय बी प्रश्न विचारा, लगेच उत्तर तयार."

"आई वाढतेय तिच्यात... आई. " म्हणत कोणी तिच्या पायाशी मस्तक ठेवत होते.भाबडे अनपढ लोक पिंकीबद्दल आपापली मते मांडत होते.

इकडे मालन एका मोठ्या तमासगिराच्या पोरांबरोबर केव्हाच पसार झाली होती, पुन्हा तोच नाचगाण्याचा खेळ मांडायला...पण तिने एवढे दिवस पिंकीला दिलेल्या शिकवणीमुळे त्या घाणीत जाऊन मलिन होण्याआधीच सुटका होऊन पिंकीला देवाच्या देव्हाऱ्यात कायमचे स्थान मिळाले होते, त्या नरकापेक्षा हे घुमणं केव्हाही योग्य.

'दोन्ही मुली दोन टोकाच्या. ना जातीपातीचा पत्ता, ना नात्यागोत्यांची ओळख, संस्कार वगैरे याची तर खिजगणतीच नाही. तरीही दोघींनी आपापली मार्ग निवडले.
एक निशिगंधासारखी, जन्म मिळाला आहे तर फुलण्याला पर्याय नाही, म्हणून रात्री फुलणारी, दरवाळणारी, सुगंध पसरून सकाळी कोमेजून गेलेली. मुजरा करत प्रत्येकापुढे झुकणारी.

तर दुसरी पिंकी, मानाचे स्थान प्राप्त झालेल्या वृन्दावनातल्या तुळशीसारखी. प्रत्येकाने येऊन तिच्यापुढे मस्तक टेकवावे. खाली झुकून नतमस्तक व्हावे. एवढी पवित्र.

दोघींच्याही वाट्याला आलेले एकमेव साम्य, ते म्हणजे नशिबी आलेले युगायुगाचे घुमणं. एक हातात टाळचिपळ्या घेऊन, तर दुसरी पायात घुंगरमाळा घालून.

*****


**सिद्धी चव्हाण**

siddhic1991@gmail.com

# परात्पराय नमः

"आई, अजिबात झोप येत नाही आहे, एखादं गाणं म्हणशील का?" मिहिकने लाडीकपणे आईकडे मागणी केली.तिच्या मांडीवर डोकं पण ठेवलं. ६ वर्षचं लेकरू ते.आईचा वेळ हवा असतो अजून काय?

"अरे,माझ्या गाण्याने झोप येईल की झोप पळून जाईल. हाच मोठा प्रश्न आहे. माझ्याकडे एक उपाय आहे.तुला आवडेल असा."

"Alexa, please play मैंय्या मोरी मैं नही माखन खायो."

मी माझं काम अलेक्साला सांगितलं आणि हलकेच मिहिकच्या डोक्यावर थोपटायला सुरवात केली.तो पर्यंत

अलेक्साने कुठल्या चॅनेल वरून गाणं लावलं पण त्यात ती मज्जा नव्हती. मी तिला परत request केली.

"Alexa, please play मैंय्या मोरी मैं नही माखन खायो, by अनुप जलोटा" आणि आमच्या दोघांचं आवडत भजन, अतिशय भक्तिमय आवाजात सुरू झालं.

*मैया मोरीऽऽऽऽ*
*सुन मैयाऽऽऽमोरीऽऽऽ*
*मैंय्याऽऽऽऽऽऽ*
*मोरीऽऽऽऽऽ*
*मैंय्याऽऽऽऽ मोरी*

कन्हैय्या की लीला मैं सबसे नटखट लीला माखन चोरी की ....असं म्हणत अनुप जलोटा हे गाणं चालू करतात,तो तबल्याचा सूर,आपल्याही नकळत आपल्यासमोर नटखट कृष्णाला उभं करतो.

"मिहिक, तुला दिसतो का रे कृष्णा?"
"आऊ , कृष्णा बाप्पाने ने आताच लोणी खाल्लं आणि मैंय्या आली म्हणून अर्धं पुसलं ते लोणी, काहीसं तसंच आहे.मी लपून साखर खातो तेव्हा दिसतो ना तसा😉"

"खरंच की, माझा कृष्णा ग!!" म्हणत मी त्याची एक पापी घेते. गाणं मागे चालूच असतं, मी आणि मिहिक कृष्णाला मनात सामावून घेत असतो.

*"मैंय्या मोरी मैं नहिं माखन खायो |*

*भोर भयो गैयन के पाछे, मधुवन मोहिं पठायो ।*
*चार पहर बंसीबट भटक्यो, साँझ परे घर आयो ॥"*

काय सूर आहे, काय आवाज आहे.अक्षरशः पूर्ण वृंदावन आपल्यासमोर उभं राहतं. गाणं संपता संपता, मिहिकचे प्रश्न तैयार होते. तसं आम्ही हे गाणं आधीही 2 दा ऐकलं आहे.पण दोन्हीवेळा तो गाणं संपता संपता झोपून गेला होता. पण ह्यावेळी मुलगा मात्र टक्क जागा होता माझ्या मांडीवर.

"मम्मी, ह्यावेळी मला अर्थ पण सांग ना? दरवेळी मी झोपून जातो ग. आज सांग ना."

"अरे बाबू कसं असतं ना, कृष्णा बाप्पा लोणी खातात.ते मैंय्या बघते, आधीच सगळ्या गवळणी रागवत असतात की तुमचा कृष्णा, आमच्या घरचं लोणी खाऊन टाकतो. आज काय झालं तर त्याने स्वतःच्या घरातलं लोणी खाल्लं. मैंय्याने ते बघितलं पण, मैंय्याने विचारल्यावर बाप्पा सांगतात की मी नाही खाल्ले लोणी. मैंय्याने तर बघितलं असून सुद्धा,

ते काहीही कारण देतात. ऐकतच नाही बघितल्यावर हट्टाला पेटल्यासारखे आईला असं सुद्धा म्हणतात की मी तुझा मुलगा नाही आहे म्हणून असं करते ना. तेव्हा मात्र आईलाच वाटायला लागतं की आपण उगाचच बाळाला बोललो.तिला वाईट वाटतं मैंय्या म्हणते "नाही रे, माझ्या बाळाने नाही खाल्लं लोणी" कृष्णा बाप्पा हिंदीत बोलत असतात सुरवाती पासून म्हणत असतात "मैं नही माखन खायो" पण शेवटी ते आईला म्हणतात की"मैने ही माखन खायो" आहे की नाही गंमत.?एकाच वाक्यामधले शब्द बदलले की त्याचा अर्थ बदलतो. समोरच्याला जसं समजून घ्यायचा ते घ्यावं." मी त्याला समजवायचा प्रयत्न केला

"मम्मी, गमंत कसली ग, ज्या ज्या गोष्टी तू सांगते वाईट आहे.त्या सगळ्याच कृष्णा बाप्पाने केल्या ना ग? खोटं बोलला
आईला उलटून बोलला.Bad boy zala na g to?"

त्या एका वाक्याने मी क्षणभर एकदम हादरली. त्याला थोपटत होतीच मी,पण त्या क्षणांसाठी हात थरथराला.त्या एका क्षणात अनेक विचार माझ्या डोक्यात येऊन गेले . प्रश्न विचारायचे पण geans असतात का? हाच प्रश्न मी काहीश्या वेगळ्या पद्धतीने माझ्या लहानपणी माझ्या वडिलांना विचारला होता की नेहमी खरं बोलायचं असतं मग कृष्ण खोटं का बोलला? बरोबर हाच प्रश्न ह्याच्या डोक्यात कसा. मी ह्याला जे काही सांगते ते सगळं कळत का त्याला. ह्या प्रश्न भडिमारातून, मी स्वतःला पहिले सावरलं, आई असण्याचा पहिला नियम आठवला, आईने मुलांसमोर गोंधळून जायचं नसतं. हा प्रश्न येणार हे माहिती असल्याचे भाव आणून मी त्याला खूप शांतपणे बोलायला सुरुवात केली. परत त्याला हलकेच प्रेमाने थोपटत होतीच मी.वेळ फार नाजूक होती.

"बाळा, कृष्ण खोटं कुठे बोलला तो तर सांगतच होता की मैने ही माखन खायो. आणि मैंय्याने स्वतः बघितलं होत ना तरीही तिने विश्वा...."

माझ्या विचार करून उत्तर देईपर्यंत बाळ झोपलं. मी मात्र जागी झाली. मला पप्पा आठवायला लागले. एकदा पप्पांनी हे गाणं ऐकवलं होतं. पप्पांचा आवाज फार चांगला नव्हता पण लेकीसाठी त्यांनी गाणं गायलं. खूप आनंदी क्षण होता तो .माझ्याही नकळत मी आठवणींच्या सागरात शिरली. मला अचानक आठवलं की आमच्या लहानपणी परिस्थिती ठीकठाक होती. पण पप्पांनी एक radio घेतला होता.अनुप जलोटा, अनुराधा पौडवाल, अजित कडकडे अश्या अनेक गायकांच्या कॅससेट्स होत्या. पप्पांनी एक अमूल्य ठेवा आम्हाला दिला होता. भजन, संगीत नाटकातील गाणी, त्यांचे अर्थ ह्यांच्याच खूप आठवणी आहेत पप्पां आणि माझ्या.

जेव्हा मी पप्पांना हा प्रश्न विचारला की "कृष्ण का खोटं बोलला?" तेव्हा पप्पांनी सांगितले की बाळा, "हे लक्षात घे की तेव्हापासून कृष्णाने आपल्याला सांगितलं की, आयुष्यात आपण काय बोलतो ह्यावर लक्ष असू द्याव, लोकानी काय ऐकलं ह्याची काळजी आपण करत बसलो ना आपल्या ध्येयापासून आपण लांब जातो. छोट्याशा आई मुलाच्या संवादातून कृष्णाने खूप मोठं सार आपल्यापर्यंत पोहचवलं आहे.वाक्याचा अर्थ आपण घेऊ तसा निघतो. वृंदावनात सगळेच गवळी . सगळंच दूध, दही, लोणी मथुरेला विकायला न्यायचे. आपल्याच घरात बनवलं जात मग लहान मुलांना मिळावं. ह्या विचारासाठी कृष्णा बाप्पाने हा घाट घातला. मुलांमध्ये एकी, धाडस हे गुण यावे म्हणून दह्याहंडी फोडायला मानवी थर लावले. देवकीनंदन म्हणजे भविष्य, भूत आणि वर्तमान. हरी म्हणजे दिशा,

यशोदावत्सल म्हणजे आनंद,गोविंदा म्हणजे आयुष्य." हे बोलताना डोळे मिटून , हात जोडून त्या विश्व विधात्याला नमस्कार करत उभे असलेले पप्पा आणि त्यांचे शब्द मनात कोरले. पप्पा म्हणायचे की "सारथी, मार्गदर्शक म्हणजे कृष्ण. तो स्वतः येतो मदतीला, जेव्हा गरज असते." तेव्हा खूप वाटायचं काहीतरी व्हावं मदतीला कृष्ण यावा. जसा पप्पांनी सांगितला, ज्याच्या गळ्यात वैजयंती माला, मुकुटात मोरपीस , हाती बासुरी, पद्यम, परशु, गदा, शंख आणि सुदर्शन चक्र अश्या कृष्णाला मी शोधायची, विचार करायची की असा योगेश्वर मला मदतीला येईल ना, खरा कमलनाथ येईल ना...

पण आता कळत आहे कृष्ण मनात असतो. तों कोणाच्याही रुपात येऊ शकतो. आपल्या गरजेच्या वेळी मदत म्हणजे कृष्ण.लहानपणी मुरलीमनोहर जितका आवडायचा ना त्यापेक्षा खूप जास्त समजत गेला कृष्ण.पप्पा जेव्हा कृष्णाबद्दल सांगायचे तेव्हा नाही कळालं असं नाही, आता जाणवलं की पप्पा पण कृष्णच तर होते माझे मार्गदर्शक, माझी ताकद. त्यांनीच मला सांगितलं की कृष्ण असेल सोबत नेहमी.

ह्या आयुष्याच्या परीक्षा द्यायला सुरुवात केल्या म्हणजे माझ्या कारकिर्दीत अनेक प्रसंग आले, ज्यात तावून सुलाखून मी बाहेर निघाली. ज्यात माणसांना कसं ओळखावं, खरं कोण वागत खोटं कोण वागत हे शिकत गेली. आपल्या कामावर आपली असलेली निष्ठा आपल्या तारून नेते, 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' हे एक वाक्य तुम्हाला सगळं काही मिळवून देत. त्यातला एक प्रसंग नेहमी आठवतो, खूप अवघड आणि वेळखाऊ प्रकल्प(प्रोजेक्ट) होता. सगळ्यांनीच मन लावून काम केलं. प्रोजेक्ट संपल्यावर चांगल्या लोकांची यादी सरांना पाठवायची होती.

messagenger वरून मी नाव पाठवलं त्यात "मीना ही productive" असं लिहून पाठवलं पण त्या सरांनी चुकीने "मी नाही productive" अस वाचलं, आमचे सर चांगले होते त्यांनी मला बोलवून विचारलं आणि हा शब्दांचा घोळ आमच्या लक्षात आला. शब्द माध्यम आहे पण आपले कष्ट आपली ओळख असते. शब्द कधीतरी गडबड करू शकतात पण आपल्या कष्टातुन साकार झालेल्या वलयाला नाकारू नाही शकत.

आपण खंबीर असलो की तो असतोच आपल्या बरोबर. आपण सगळेच अर्जुन, कधीतरी विसरतो, गोंधळतो, आपल्या लक्षात येत नाही. तिथे त्याला शरणागत जायचं. तो असतो मार्ग दाखवायला. तोच कथा,तोच कविता, तोच आद्य,तोच अंत,तोच परमार्थ. त्याने त्याच्या हयातीत आपल्याला अनेक पाठ शिकवले आपण आता ते कसे घेतो त्यावर आपलं अस्तिव आहे.हे माधवा, आम्हाला नेहमीच मार्ग दाखव

कृष्णावरती माझ्याही नकळत मी प्रेम केलं. आहेच तो प्रेम करण्यासारखा आणि हेच प्रेम मी माझ्या बाळाला देणार. त्याला सांगणार इथला श्वास सुद्धा कृष्ण, इथलं आकाश,धरती,आनंद,दुःख, कर्म सगळंच कृष्ण. तो मार्गदर्शन करणार, आपण ते समजून घेतलं की आयुष्य सार्थकी.पप्पांनी जी गोष्ट मला आयुष्यभराची शिदोरी म्हणून दिली तशीच मी तुला देईन बाळा. खूप अगाध आहे मुरारी, जेवढं जमेल तेवढा मी सांगेन, बाकी तू शोध मिहिक, मिहिकच्या डोक्यावरून हात फिरवत. त्याच्यासाठी उदंड आयुष्याची प्रार्थना केली. तुलाही तो सापडेल जसा पप्पांना आणि मला सापडला तसा,

ॐ पार्थसारथये नमः।

ॐ कालीय फणिमाणिक्य रञ्जित श्री पदाम्बुजाय नमः।

*****

**अर्चना चौधरी\गवस** - 9158982904

*archanachaudhari20079@gmail.com*

# जुळून येती रेशीमगाठी

‘खरंच लग्नाच्या गाठी अगोदरच जुळलेल्या असतात का ? मला तरी तशी प्रचिती आली आहे. नाहीतर कुठे नांदेड आणि कुठे नाशिक. पण जोडी जुळलेली होती म्हणून सगळं जुळून आलंच.’

लोक प्रेमासाठी सात समुद्र पार करतात .मी ७०० किमी पार केले.😜😜

तसं पाहायला गेलं तर आमचं लग्न arrange marriage पण आमच्या मते तरी ते love with arrang झालं.

झालं असं की पप्पांनी कोणाला काही न सांगता मुलगा पाहण्याचा कार्यक्रम ठरवला.प्रत्येक ठिकाणी मुलगा मुलीला पाहायला येतो ,पण आम्ही मुलीकडचे मुलाला पाहायला गेलो .मला तर नेहमी काहीतरी वेगळं करायचंच असतं ,पण यावेळेस पप्पांनी पण वेगळं करायचं ठरवलंच होतं.पण काय उपयोग , पप्पांचा काहीतरी वेगळं करण्याचा प्रयत्न चुकलाच.

मावशीने स्थळ दाखवलेलं, म्हणून तिच्याकडेच सिंधुदुर्गला कांदापोह्याचा कार्यक्रम ठेवला होता. रमेश नोकरी निम्मित सिंधुदुर्गला असायचे.मुलगा सुशिक्षित, सरकारी नोकरीत आणि सुपारीच सुद्धा व्यसन नसलेला त्यामुळे पप्पांना पसंत होता.त्यांनी बोलूनच सगळ्यांचं मन जिंकलं होतं ,माझं पण..

प्रत्येक मुलीला आपला नवरा हा आपल्या पप्पांसारखा असावा असा वाटत असतं आणि रमेशचे विचारही मला पप्पांसारखेच वाटले.

मुलगा सगळ्यांना पसंत झाला आणि मुलालाही मी पसंद पडली. दोघांचा होकार झाला . सगळं जुळून आलं. फक्त लग्नाची तारीख तेवढी राहिली होती.पप्पांनी नाशिकला आल्यावर लगेच लग्नाची तारीख पण काढून आणली.आणि हाॅल बुक करायचा म्हणून मामाला बोलावलं .मामाला काही न सांगता सगळं झालेलं, त्यात एवढं दूरच स्थळ ,मामाने सगळं एकूण घरंच डोक्यावर घेतलं .'गाव माहिती नाही ',घर बघितलं नाही, नुसता मुलगा बघून कोणी लग्न ठरवत असतं का?मामाने लगेच दुसऱ्यादिवशी मुलाचं घर बघायला जायचं ठरवल .कधी बस ने प्रवास केला नसेल, पण भाची साठी मामाने नाशिक ते नांदेड बसने प्रवास करताना कसलाही विचार केला नाही .

एवढ्या मार्चच्या रखरखत्या उन्हात मामा आणि पप्पा नांदेडला गेले . त्यात एवढा लांबचा प्रवास.जाता जाताच पप्पांचे डोळे भरून आले होते .गावात पोहचले अन् तिकडचे लोक ,वातावरण,त्यांच्या पद्धती पाहून पप्पा रडायलाच लागले . 'माझी मुलगी' अशा परिस्थीत कशी राहणार ? पप्पांनी घरी पोहचताच मावशीकडे निरोप दिला की लग्न नाही जमणार म्हणून.

रमेशने लग्न मोडण्याचं कारण विचारलं तर त्यांना ते कारण शुल्लक वाटत होतं. त्यांनी मला फोन केला .काय करायचं ? मी सांगितलं मामाला तयार केलंत तर मला काहीच हरकत नाही .मी लग्नाला तयार आहे, एवढ्याच गोष्टी वरून ते मामाला मनवायला , दोघं - तीघं मित्र व नाशिकचे त्यांचे काही पाहुणे घेऊनआले .बोलण्यात तर त्यांना कोणीच हरवू शकत नाही .त्यांनी गोड बोलूनच सगळ्यांना पटवलं. पण मामा काही मानायला तयारच झाला नाही . रमेशने सांगितले होते मामा तयार नसला तर पळुन जायची तयारी ठेव.पण माझ्याच्याने ते शक्य

नव्हतं.शेवटी मामाने माझं काय मत आहे ते विचारलं .मी म्हटलं मला पसंत आहे. मामा काहीच म्हटला नाही .त्याने पण शेवटी होकार दिला ,पण लग्नात काही माझा मागे उभा राहिला नाही. म्हणून म्हटलं आमचं लग्न love with arrange झालं.आणि सगळ्यांचा विरोध असूनही फक्त दोघांच्या होकारावर जुळून आलं .

ते म्हणतात ना मिया बिवी राजी तो क्या करेगा काझी!😄

माझा लग्नाला खूप दूरचं स्थळ आहे म्हणून विरोध करणाऱ्या मामाला सगळ्या जावयांमध्ये रमेशच लाडके जावई आहेत आणि आता स्वतःच्या मुलाला मुलगी सुद्धा माझा सासरचीच आणली आहे.

त्या दोघांचीही गाठ अगोदरच बांधलेली असणार .

मामा भेटला तर मी मुद्दाम गाणे गुणगुणते 'जुळुन येती रेशीमगाठी.......'😍

*****

**वैशाली चाटे**

*vaishalichate51@gmail.com*

# डेटिंग बिटिंग

"काय सांगतेस काय ईशा? तू त्या मुलाला dating app वर भेटलीस? अगं आधीच मुलांचा काही भरवसा नसतो आणि हा तर अशा ठिकाणी भेटलाय."
"अशा ठिकाणी म्हणजे? अगं हे apps हल्ली खूप जण वापरतात. Casual dating असलं तरी माणसं खरीच असतात ना?"
"ते गाणं ऐकलंयस ना, casual friends थे फिर bestfriends हो गये?"
"हो अगं, बिगिनी शूट, काहीही आणि, ते गाणं नाहीये मुळात "

"गाणं असो वा डायलॉग तू मुद्दा लक्षात घे "
"Ok dear,जास्त involve नाही होणार आणि alert राहणार. बास का? आता जाऊ मी date ला?"
"मास्क लावून जा गं आणि दूर राहा त्याच्यापासून, दो गज की दुरी पाळ, sanitizer स्प्रे केल्याशिवाय no handshake आणि hug बिग तर नकोच "
"हो हो आजीबाई, निघते, आणि कळवते तुला online राहा chatting app वर "
......
थोडया वेळानंतर......
......
"Hieeee, आलीस पण लगेच?"

"मला कडक चहा हवाय, प्लिज कर "
"डोकं दुखतंय का?"

"हसू नकोस, the date was terrific!!"

"बरं झालं "

"म्हणजे?"

"काही नाही, हा चहा घे. मला सांग नेमकं काय झालं?"

"अगं, तो मुलगा mad होता. सतत uk चं कौतुक! त्याला काय obsession आहे uk चं देव जाणे. प्रत्येक गोष्टीच्या दुसऱ्या वाक्यात uk, uk. सतत uk. असं वाटत होतं त्या टॉवर ब्रिज खाली गाडून टाकावं ह्याला "

"शांत हो, हे होणारच होतं. तू व्यवस्थित अभ्यास करून गेली नव्हतीस"

" date वर गेले होते परीक्षेला नाही, अभ्यास कसला नीट सांग "

"त्या त्याचं sm analysis केलं असतंस तर असा वेळ वाया गेला नसता. मी बोलणार होते पण तू ऐकायच्या मूड मध्ये नव्हतीस"

" sm analysis काय आता नवीन? नीट सांगतेस का.? आधीच डोकं खराब झालंय "

" अगं काही नवीन नाही, जुनंच. Sm म्हणजे social media. जसं की insta, febu.. "

" माहितेय पुढे बोल पटापट, एक मिनिट, u mean मी त्याला stalk करायला हवं होतं? No way, एवढा वेळ नाहीये माझ्याकडे?

" ऐकून घे, घाईच फार असते तुला. आता गेला ना वेळ वाया त्या uk वाल्यामुळे? "

" बोल "

" त्याचं insta वगैरे सगळं पाहायचं. कुठे check in करतोय, गाणी कोणती वापरतोय reels ला, photos मध्ये काय आहे, सोबत कोण कोण आहे

वगैरे. Febu वर पण थोडीफार मिळते माहिती. पण असले so called cool dudes insta वर पडीक असतात. तू आहेस ना? "

"हो, आहे पण जास्त पाहत नाही. Boar होतं मला "

" पण हल्ली सगळे तिकडेच timepass करतात. तुझे 47 followers आहेत फक्त. Reels नाहीत. Checkins नाहीत. मुलांना कसं समजणार तुझ्या आवडी? "

" ए तू माझ्यावर घसरू नको "

" मग काय, dating app चालतं, insta नको म्हणते "

" बरं माझे बाई, आता काय करू सांगणार आहेस का? "

" पुढच्या date ला जाण्याआधी माझं मार्गदर्शन घे. आपण नीट plan करू. तू कोणते कपडे घालणार, jewellary, तुझं eyeliner सुद्धा मी लावून देणार "

" तू फारच controlling होत चाललीयेस हल्ली "

" व्हायलाच हवं. शेवटी तुझी मोठी बहीण आहे ना मी!"

" हो ताईसाहेब, चला पुढचा case study सुरु करूयात. नवा match आलाय "

आणि ते घर त्या दोन बहिणींच्या हास्य कल्लोळात बुडून गेलं.

*****

पल्लवी कुलकर्णी/ सुकळीकर

kulkarnipallavi4@gmail.com

## आमची निवडक प्रकाशने

**स्पंदन दिवाळी अंक २०१९**
*https://drive.google.com/file/d/1CtQYOAE8SFtDX-NuNpT1bqCGJ49yc_qF/view?usp=sharing*

**स्पंदन दिवाळी अंक २०२०**
*https://drive.google.com/file/d/1uQ-JAgtehZN4fglqBOGIGO59nHZ7mp7Z/view?usp=sharing*

**स्पंदन दिवाळी अंक २०२१**
*https://drive.google.com/file/d/1_Rj2X1r9TjqCkoaaVDIt_ZgusWOwhBAF/view?usp=sharing*

---------------------------------------

**माझ्यातली ती स्त्री विशेषांक २०२०**
*https://drive.google.com/file/d/19FLdN4Zq-EoKXuS_KgWAbrORBoi4sUxl/view?usp=sharing*

**माझ्यातली ती स्त्री विशेषांक २०२१**
*https://drive.google.com/file/d/1JJOuWfuFD0725_YNEYFhEVmmlfAAp4Ly/view?usp=sharing*


शब्दांश प्रकाशन

*sevasahitya@gmail.com*
*https://www.facebook.com/sevasahitya*